# आदिवासींची जात: शासन निर्णयांचे सोपे आणि दुर्बोध संदर्भ

– राजेंद्र दा. मरसकोल्हे, नागपूर
मो.– ९४२२१६३८०९

मागासवर्गीय प्रर्वगातील कर्मचा–यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणि जात प्रमणपत्र अवैध ठरल्यास पुढील कार्यवाही करण्याच्या कार्यपध्दती बाबत महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने १८ मे २०१३ रोजी राज्याचे मुख्य सचिव जयंतकुमार बांठिया यांनी शासन निर्णय निर्गमित केला असून येत्या ३१ जूलै २०१३ नंतर 'हटाव' 'बचाव' च्या घोषणेसह आदिवासी विरूध्द बोगस आदिवासी असा कलगीतूरा रंगण्याची चिन्ह आहेत. महाराष्ट्रातील ४५ मुख्य आदिवासी जमातींमध्ये कमालीची विविधता, भाषा, पेहराव, रोटीबेटी व्यवहार, संस्कृतीच्या भिन्नतेमुळे आपल्या न्याय हक्काच्या मागण्यासाठी अथवा अन्याय निवारणासाठी त्या कधीच एकत्र आल्या नाही. गेल्या सहा दशकात आपल्या संविधानिक अधिकाराविषयी स्वबळावर निर्धाराने कधीही रस्त्यावर उतरू न शकणा–या आणि जागरूकतेचा कमालीचा अभाव असलेल्या उदासिन आदिवासींना त्यामुळेच आदिवासी विकास विभागात ६ हजार कोटी रूपयांचा घोटाळा आज 'याची डोळा' पाहावा लागत आहे. असा घोटाळाच झाला नसल्याचे प्रतिज्ञापत्र विभागाने न्यायालयात दिले असले तरी त्यातील तत्थ्य यथावकाश पुढे येइलच. हा घोटाळा पुढे आणण्यासाठी बहिरम यांना न्यायालयाचा आधार घ्यावा लागतो, यावरून प्रशासनाची निगरगठठ् वृत्तीच उजागर होते.

असाच मोठा घोटाळा आदिवासी जमातींच्या नोकरी आणि पदोन्नती लाटण्याच्या संदर्भात १९७० च्या दशकापासून राज्यात अव्याहतपणे शासनाला साक्षी ठेउन उजागीरीने सूरू आहे. कोळी, कोष्टी, कुणबी, कुंभार, धोबी, राजपूत, धनगर, क्षत्रिय इत्यांदी समाजाच्या मुख्य प्रवाहात असलेल्या शहाण्या लोकांनी ते आदिवासी असल्याचा जाणीवपूर्वक जावईशोध लावून खोटया दाखल्यांच्या मदतीने अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळवून आदिवासींना मिळणा–या संविधानिक अधिकारांची अक्षरश: लुट केली. राज्य आणि केंद्र शासनाच्या नोकरीत अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातून खोटया दाखल्यावर नोकरी आणि मोठया हुदयावर पदोन्नती मिळविणा–यांची संख्या केंद्रातील आणि राज्यातील शासकिय, निमशासकिय कार्यालये आणि खाजगी प्राधिकरणात आज २ लाखापेक्षा कमी नसावी..! खोटया जातीच्या दाखल्यावर नोकरी आणि पदोन्नती जाणीवपूर्वक घशात घालून समाधानाची ढेकर वर्षानुवर्षे घेत असलेल्या (हे स्वत:ला अन्यायग्रस्त आदिवासी संबोधतात) या लाखो कर्मचा–यांचे कुटूंब त्यांची नोकरी गेल्याने उघडयावर पडू नयेत याची खबरदारी घेताना दुसरीकडे शासन मात्र नोक–यांपासून वंचित राहिलेल्या, अधिकार हिरावून बसलेल्या ख–या आदिवासींचा विचार त्याच मानविय दृष्टीकोणातून करताना दिसत नाही. खोटया जात प्रमाणपत्रावर नोकरी लागलेल्या अनु. जमातीच्या कर्मचा–यांना सेवेत संरक्षण मिळावे म्हणून १५ जून १९९५ व ३० जून २००४ सारखे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले. या शासन निर्णयांना ते असंविधानिक आणि न्यायोचित नसल्याने उच्च न्यायालयाने चांगलेच लाथाडले आहे. याउपरही त्याची अंमलबजावनी करीत सेवेत संरक्षण देण्याची कार्यवाही करण्यात आली. जात पडताळणी साठी अनेक निर्णय आणि कायदा असताना कार्यालयातील मोजक्याच ठिकाणी ते अंमलात येताना दिसतात. चिरीमिरीच्या माध्यमातून प्रकरणांची , तक्रारींची दखलच न घेणे, जात प्रवर्गाचा रोस्टरच बदलून टाकणे इ. गभीर प्रकार या संबधाने घडले आहेत. लोकशाही प्रणीत या अतिसहिष्णू सरकारला हे सगळे चोरीचे प्रकार मानविय दृष्टीकोणातून चालणार असतील तर प्रवाहाच्या अलिप्त असलेल्या दुर्गम भागातील आदिवासींचा विकास ते पुढची कित्तेक वर्षे करू शकणार नाहित. या अतिसहिष्णू घोरणामुळे हजारो होतकरू आदिवासीं तरूणांच्या एका पीढीच्या रोजगाराची संधी हिरावून घेतली आहे. आय.आय.टी., मेडीकल, इंजिनिअरींग, महाराष्ट्र आणि केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या अनेक राखीव जागांवर पूर्वी आणि अलीकडेही शेकडो मुलांनी खोटया जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश घेउन शिक्षण पूर्ण करीत नोकरीतील मोठी पदे मिळविली आहेत. त्याच सुबत्तेचा

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.smartpdfcreator.com

उपयोग करीत कोटयावधी रूपयांचा लढा निधी उभा करून, स्वत:च्या बाजूने उच्च आणि सर्वोच्य न्यायालयात वकिलांना तगडे मानधन देत युक्तीवादासाठी पाचारण करून अन्यायग्रस्त म्हणवणा—यांना 'न्याय' देण्यासाठी करण्यात येत आहे. आपल्या अधिकारा विषयी जागरूक नसलेला, विखुरलेला, बेफिकीरीची वृत्ती जोपासणारा आदिवासी याचे गांभिर्य आजतागायत ओळखू शकला नाही. न्यायालयात निव्वळ सरकारवर अवलंबून राहुन ऐन महत्वाच्या सुनावनीच्या वेळी सरकारची बाजू प्रभावीपणे मांडण्याचे सोडून सूनावणी साठी पुढची तारीख मागणारे आणि नंतर पुढच्या तारखेस जाणिवपूर्वक गैरहजर राहुन दीर्घकाळ याचिका प्रलंबित ठेवण्यात हातभार लावत बोगस आदिवासींठी असे 'पूण्या'चे काम करणा—या सरकारी वकिलांवर विसंबून राहुन प्रभावीपणे आपली योग्य बाजू न मांडता आल्याने अनेक प्रकरणात बोगस आदिवासींना न्यायालयाने दिलासा दिला. हे समजून घेत यावर विनाविलंब तोडगा काढण्या साठी कोणत्याही ठोस कृती आराखडयाची योजना आदिवासी सामाजिक कार्येकर्ते आणि शासनाच्या डोक्यात नाही. १८ मे २०१३ च्या शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी झाल्यास गैरआदिवासींनी बळकावलेल्या जागा रिक्त होतील आणि त्या लाखो जागा शासन क्षणात भरून आदिवासीच्या आरक्षणावर आजतागायत झालेल्या अन्यायाची 'अंशत:' परतफेड करणार आहे, अशी आशा व्यक्त करताना त्याच्या अनेक घातक पैलूंचाही विचार त्याच वेळी झाला पाहिजे. १९९५ पूर्वीच्या कर्मचा—यांना सेवेत सामावून घेण्याची भूमिका शासनाने घेतली असताना, त्यांना ते ज्या मुळ जात प्रवर्गाचे आहेत त्या प्रवर्गात अथवा खुल्या प्रवर्गात टाकून नियुक्ती आणि पदोन्नती कायम ठेवित असल्यास त्या पासून वंचित राहिलेल्या आदिवासींना राज्यघटनेचे कलम १४ व १६ अद्याप 'हयात' असताना नियुक्ती आणि पदोन्नतीचा लाभ शासन कशा प्रकारे देणार आहे, न्यायालयीन प्रक्रियेच्या आड अपेक्षित विरोध आधिच 'मॅनेज' करून शिताफिने स्थगनादेश मिळवित दीर्घकाळ अगदी निवृत्तीपर्यत अनु. जमातीच्या सवलतींचा घेण्यात येणारा लाभ सन—२००० मध्ये राज्यात तसा कायदा अंमलात आल्या नंतर काढून घेण्यासाठी काय योजना आहे, सर्वोच्य न्यायालयातील मिलींद कटवारे याचिकेवरील निर्णयाच्या आधी कोष्टी जातीला मिलींद प्रकरणातील निर्णयाच्या आधीन राहुन सन २००० पूर्वी १९८ 'कंडीशनल' जात वैधता प्रमाणपत्र हलबा म्हणून अनु. जमातीचे शिक्षण आणि नोकरी साठी एकटया नागपूर जात पडताळणी समितीने दिले. त्याच्या आधारे लोकसेवा आयोगाने त्यांच्या नियुक्त्या दिल्या ते आता वर्ग —१ ची पदोन्नती लाटून बसले आहेत, त्यात विद्यमान उपजिल्हाधिकारी चंद्रकांत आणि प्रदीप डांगे या बंधूंचाही समावेश आहे. या प्रकरणी शासन सर्वोच्य न्यायालयात गेले आहे. तत्सम प्रकरणावर काय तोडगा असू शकेल, लोकसेवा आयोगामार्फत हलबा जमातीच्या जात प्रमाणपत्रावर नोकरी मिळणा—या व ते अवैध ठरल्यावर स्वत: कोष्टी असल्याचे जात वैधता प्रमाणपत्र घेउन सेवासंरक्षण मागणा—या चंद्रभान पराते नावाच्या उपविभागीय अधिका—याने १३ नोव्हेंबर २००० ते ३० आक्टोबर २००१ दरम्यान १ हजार २०६ गैरआदिवासी कोष्टींना 'हलबा' अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र दिले, शासनाने या 'उदंड' समाजसेवेसाठी त्यांना काहीकाळ निलंबित केले. त्यांच्या 'सेवे'चा वसा आता त्यांच्या पत्नी नंदा पराते यांनी हाती घेत दलित बांधवांना खो देत 'आदिम संविधान संरक्षण समितीची' स्थापना करून 'धोक्या'त असलेल्या संविधानावर होत असलेले १८ मे २०१३ सारखे हल्ले अशा अन्यायग्रस्त सैनिकांच्या सोबतीने परतवून लावीत आहेत..! हे सारे वेळीच थांबविण्यासाठी शासनाने 'पॉलिसी डिसीजन' घेण्याची ही वेळ आहे. मात्र शासनाने अद्यापही आपली भूमिका स्पष्ट केली नाही.

स्वत:ला अन्यायग्रस्त म्हणवून कांगावा करीत राजकिय सहानुभूती मिळविणारे मात्र त्यांनी खोटया जातीच्या दाखल्यांच्या आधारे त्यांनी मिळविलेली नोकरी टिकविण्यासाठी माध्यम, राजकिय दबावतंत्र, न्यायालयीन प्रक्रिया, इंटरनेट अशा विविध आयुधांचा प्रभाविपणे वापर करीत आहेत. दुसरीकडे सामाजिक प्रवाहापासून वर्षानुवर्षे अलिप्त असलेल्या आणि दुर्गम भागात अजूनही वास्तव्यास असलेल्या कोणत्याही आंध, गोंड, कोलाम, परधान, वारली, भिल्ल, कातकरी, ठाकर, हलबी, माडीया

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

आणि तत्सम जातीचे कर्मचारी शहरात नोकरीच्या निमित्ताने आले तरी अन्याय सहन करण्याची मानसिकता अद्यापही त्यांनी झाटकली नाही. काही अपवाद वगळल्यास प्रस्थापिता विरूध्द बोलण्यास ते धजत नाहीत, स्वत:वर अन्याय झाला म्हणून 'हुशार' गैर आदिवसींसारखा कांगावा करीत नाहीत, न्यायालयात याचिका दाखल करीत नाहीत, मोर्चे काढत नाहीत. आतिदुर्गम भागात वास्तव्यास असलेल्या आदिवासींना १९५० पूर्वीच्या जातीच्या नोंदी उपलब्ध होतात, मात्र अन्यायग्रस्त म्हणविणा—या शहरी 'आदिवासींनी' आरक्षणाचे फायदे जाणिवपूर्वक लाटण्यासाठी १९५० नंतर आपली जात बदलली असल्याने जात वैधतेस अडचण ठरते. एकटया **नागपूर महानगरपालिकेत १९९५ नंतर अनु. जमातीच्या प्रवर्गातून सेवाप्रवेश केलेल्या अशा १८८ गैरआदिवासी कर्मचा—यांना सेवासंरक्षण देण्यात आले आहे.** नोव्हेबर—२०१२ ला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात न्या. भूषण गवई यांनी रिट याचिका ५१९८/२००९ व २१२६/२०१० वर निर्णय देताना बोगस आदिवासींना त्यांनी **अनु. जमातीचा दावा सोडल्या बाबतचे पूर्सीस दाखल केल्याने सेवासंरक्षण दिले.** त्यात **५१ कोष्टी, ४ ठाकूर व ६ इतर** जातीचे कर्मचारी होते. त्यातील ४ कर्मचारी सेवानिवृत्त होते. त्यांनी दावा सोडला असल्याने जात पडताळणी हा केवळ औपचारिकतेचा विषय असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले. **५१** कर्मचा—यांनी सेवा संरक्षणासाठी **अनु. जमातीचा दावा सोडल्यावर** आणि **कोष्टी** असल्याचे उच्च न्यायालयात पूर्सीस सादर करून मान्य केल्यावरही इकडे हलबा असल्याची पूंगी जाहिरपणे माध्यमांपुढे वाजवून आपला खोटारडेपणा उघडकीस येउ नये म्हणून जात पडताळणीची अट रदद् करण्याची मागणी करतात तर दुसरीकडे 'कोष्टी' जातीचे **विशेष मागास प्रवर्गाचे** प्रमाणपत्र वैध ठरविण्यासाठी हजारोच्या संख्येने अर्ज जात पडताळणी समितीकडे सादर होत आहेत. हा विरोधाभास **'हलबा कर्मचा—यांना सेवासंरक्षण'** अशा विपर्यस्त मथडयाच्या बातम्या देणा—या माध्यमांनीही लक्षात घेणे गरजेचे आहे. अनु. जमातीत नियुक्ती आणि पदोन्नती साठी उपयोगात आणल्या गेलेल्या खोटया जात प्रमाणपत्राचे प्रमाण निम्याहून अधिक आहे हे १९९५ नंतर जे ३४ हजार अधिकारी आणि कर्मचारी भरती झाले त्यापैकी जवळपास ३० हजार कर्मचा—यांनी जात वैधता प्रमाणपत्र अद्याप सादर केले नसल्याचे अलीकडील बातम्यांवरून स्पष्ट झाले आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनीच २०१२ च्या विधिमंडळाच्या बजेट सत्रात अनु. जमातीच्या खोटया जात प्रमाणपत्रावर १ लाख ५ हजार कर्मचारी विविध विभागात कार्यरत असल्याची माहिती एका प्रश्नाच्या उत्तरात दिली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात नोव्हेंबर २०१२ मध्ये अनु. जमातीच्या प्रवर्गातून नोकरी व पदोन्नती मिळविलेल्या शेकडो गैरआदिवासींना न्या. भूषण गवई यांनी सर्वोच्य न्यायालयाने **कविता सोळंकी** प्रकरणाचा आधार घेत कायदयाच्या चाकोरीत राहुन सेवासंरक्षण दिले. कविता प्रकरणात जात पडताळणी समितीने १० वर्षानंतर जातीचा दाखला अवैध ठरविल्याचा निर्णय कायम ठेवत या जात प्रमाणपत्राचा लाभ यापुढे घेता येणार नाही, हे स्पष्ट करून सेवा समाप्त करू नये, असा निर्णय दिला होता. कविता प्रकरणानंतर योगायोग असा की, वर्षोनुवर्षे दाखल होउन प्रलंबित असलेल्या नागपूर खंडपीठातील अनेक याचिकांवर न्या. गवईंनी 'मानवतेच्या' दृष्टीकोणातून 'एकहाती' निकाली काढल्या. तर अलीकडे मुंबई उच्च न्यायालयाच्या याच नागपूर खंडपीठात याचिक क्र **५५६९/२०१२ राजेंद्र महिशबडवे** या **हलबा** जात प्रमाणपत्राच्या आधारे नोकरीवर लागलेल्या आणि जात पडताळणी समितीने तो गैरआदिवासी **कोष्टी** असल्याने अवैध ठरविल्या नंतर दाखल केलेल्या याचिकेवर **न्यायमुर्ती बी.पी. धर्माधिकारी आणि पी.बी. वरले** यांनी अत्यंत तर्कसंगत निकाल दिला. कलम १४१ अन्वये सर्वोच्य न्यायालयाच्या निकालांना संसदेने केलेल्या कायदया सारखे स्वरूप असते तर १४२ अन्वये सर्वोच्य न्यायालयाला संपूर्ण न्यायासाठी खास विषेशाधिकार आहेत, मात्र या विषेशाधिकाराचा वापर सर्वोच्य न्यायालय राज्यघटनेच्या विपरीत न्याय देण्यासाठी करू शकत नाही. मिलींद कटवारे अथवा कविता सोळंकी संबंधीच्या निर्णयाने ज्यांच्यासाठी घटनेत तरतुद आहे त्यांना ते लभ मिळालेच नाहीत आणि त्यांच्या सेवा संरक्षणाने लाखो आदिवासी नोकरी आणि पदोन्नती पासून वंचित राहिले आहेत. कलम १४१, १४२, २२६ चा कायदेशिर किस पाडून न्या. गवईनी जे याचिक क्र. ५१९८/२०९ आणि २१२६/२०१० मध्ये नोव्हेंबर २०१२ ला शेकडो हलबा जात प्रमाणपत्राच्या आधारे नोकरीस लागलेल्या कोष्टी कर्मचा—यांना दिलासा दिला होता, त्या उलट निकाल देत असे अधिकार उच्च

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

न्यायालयाला ते अधिकार नाहीत, असे न्या. धर्माधिकारी यांनी मत व्यक्त करीत **सेवासंरक्षण न देता ५५६९/२०१३ ही याचिका ११ मार्च २०१३ रोजी खारीज केली.** न्या. गवई नोव्हे.–२०१२ नंतर नागपूर खंडपीठातून इतरत्र बदलून गेले आणि पून्हा नागपूर खंडपीठात दाखल झाल्यावर याचिका क्र **१५११/२०१३ छाया हेमराज निमजे वि. जात पडताळणी समिती व इतर** या याचिकेवर त्यांनी घेतला सेवासंरक्षणाचा निर्णय योग्य की. न्या. धमाधिकारी यांनी घेतलेला सेवा बळतर्फीचा निर्णय योग्य हे ठरविण्यासाठी जेष्ठ विधिज्ञाच्या मदतीने उच्च न्यायालयात युक्तीवाद करण्यासाठी पाचारण केले. न्यायालय यावर नेमकी कोणती भूमिका मान्य करेल हे येणारा काळ ठरविणार असून त्यामुळे पुन्हा कोण चुक आणि कोण बरोबर ही चर्चा न्यायालयीन वर्तूळासह इतरत्रही चर्चेला येउन सर्वोच्य न्यायालयापर्यंत जाण्याची चिन्हे आहेत.

१८ मे २०१३ च्या शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून घेण्यासाठी आणि दिलेल्या ३१ जूलै २०१३ च्या मुदतीनंतर थेट बडतर्फिची कार्यवाही करून रिक्त झालेली पदे अनु. जमातीच्या प्रवर्गातून भरली जावीत यासाठी आदिवासी जनसमुदायाने सामाजिक दबाव आणून आणि लोकप्रतिनिधींनी शासनाला रेटा लावत ठराविक मुदतीत ती विनाविलंब सरळसेवा भरतीने आणि पदोन्नतीने भरण्यासाठी पाठपुरावा करण्याची गरज आहे. 'दिले तर घेउ' अशी वृत्ती असलेल्या आदिवासींना आता आपले हक्क मागायला शिकले पाहिजे. अनु. जमातीच्या प्रवर्गातून बोगस जात प्रमाणपत्रावर नोकरी आणि पदोन्नती मिळवून ते अवैध ठरल्यावर १५ जून १९९५ पासून सेवाजष्ठतेचा लाभ आणि विशेष मागास प्रवर्गातून पून्हा २ टक्के आरक्षणातून पदोन्नतीचा दुहेरी लाभ मिळविणारे कर्मचारी स्वत:ला अन्यायग्रस्त असल्याची ओरड करतात मात्र चोर कोण याची कल्पना असूनही चोरी झाल्याची तक्रार खरा आदिवासी कधीही करीत नाही. न्यायालयात स्वत:ला गैरआदिवासी कोष्टी असल्याचे मान्य करून सेवासंरक्षण घेणारे, आपल्या मुलांसाठी वि.मा.प्रवर्गाच्या आरक्षणाचा लाभ घेत जात वैधता प्रमाणपत्रासाठी गर्दी करणारे, त्यासाठी स्वत:चे मुळ हलबा जातीचे प्रमाणपत्र समितीकडे जमा करणारे तेच कर्मचारी अन्यायग्रस्त हलबा आदिवासी असल्याचा कांगावा करतात. हा विरोधाभास त्यांना सहानुभूती दाखविणा–यांनी लक्षात घेत कोण अन्यायग्रस्त आहे, हे अशा शासन निर्णयांचे सूबोध आणि दुर्बोध संदर्भ लक्षात घेउन तठस्थपणे आणि विचारपूर्वक ठरविले पाहिजे. १८ मे २०१३ सारखा शासन निणर्य १५ वर्षापूर्वीच निर्गमीत व्हायला हवा होता. १५ जून १९९५ व ३० जून २००४ सारख्या शासन निर्णयाने असे लाखो बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे आदिवासींच्या नोक–या बळकावून 'आम्ही चोरी केली, पण शिक्षा अजिबात भोगणार नाही' अशा तो–यात सेवा संरक्षण मिळवित असतील, त्याला राजकिय पक्ष आणि त्या पक्षाचे नेते २०१३ चे हिवाळी अधिवेशन चालू न देण्याची धमकी देत समर्थन करत असतील तर उथड भाषेत हे आदिवासींचे शोषण करण्यासाठी प्रस्थापीतांनी पध्दतशीर रचलेले षडयंत्र आहे, असे म्हणण्यास वाव आहे.

**स्थळ – नागपूर**

दिनांक – ०३ जूलै २०१३

**राजेद्र मरसकोल्हे, नागपूर**

**मो– ९४२२१६३८०९**

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

न्या गवई यांनी सेवासंरक्षण दिले ते **कर्मचारी अनु. जमातीच्या हलबा जातीच्या प्रमाणपत्रावर त्याच राखीव प्रवर्गातून नियुक्त आणि पदोन्नत झाले होते**. सर्वोच्च न्यायालयाच्या कविता सोळकी प्रकरणाचा आधार घेत त्यांनी **हलबा असल्याचा दावा सोडून कोष्टी असल्याचे मान्य करीत यापूढे अनु. जमातीला मिळणारे लाभ अथवा पदोन्नती घेणार नाही, माझे वारसही तसा दावा करणार नाही, असे प्रतिज्ञापत्र सादर करून सेवासंरक्षण मिळविले.**

This document was created using
Smart PDF Creator
To remove this message purchase the
product at www.SmartPDFCreator.com